दिनांक १८/०७/२०२२

**प्रसिध्दी पत्रक**

**आ.लो.से. श्री. भगवान विठ्ठलराव राऊत, वय 56 वर्षे, पद-उप विभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, अंबड जिल्हा जालना रा. सी/4/एन-4 सिडको औरंगाबाद ( वर्ग-1 ) यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.20000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे अंबड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. भगवान विठ्ठलराव राऊत, वय 56 वर्षे, पद-उप विभागीय जलसंधारण अधिकारी अंबड जिल्हा जालना, (वर्ग -1) रा. सी/4/एन-4 सिडको औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 30,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 20,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती अनिता इटुबोने, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| समन्वय अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या वडीलांचे नावे असलेली बाधीत जमिनीचा सुधारीत भुसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे पाठविण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे वडीलांचे नावे मौजे मोहपुरी ता. घनसावंगी जिल्हा जालना येथील गट क्रं.232 यांचे नावे असलेली 04 हेक्टर 90 आर जमीन होती त्यापैकी 02 हेक्टर 88 आर जमीन साठवण तलावामध्ये संपादित झालेली आहे. त्यापैकी उर्वरीत 02 हेक्टर 02 आर जमीनीमध्ये तलावाचे पाणी येत असल्यामुळे बाधीत होत आहे कोणतेही पिक येत नाही. संयुक्त मोजणीनुसार सदरील जमिनीपैकी 70 आर जमीन बाधीत झाल्याचे मोजणी अहवाल नुसार सुधारीत भुसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे पाठविण्याकरिता आ.लो.से. श्री. भगवान राऊत हे लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय औरंगाबाद येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आ.लो.से श्री. राऊत यांनी लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग.औरंगाबाद तर्फे आज दि. 19/07/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता पंच साक्षीदारासमक्ष तडजोडीअंती लाचेची रक्कम 20000/- रुपये मृद व जलसंधारण कार्यालय अंबड जवळ असलेल्या हॉटेल रुचिरा.अंबडरोड येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. श्री. भगवान राऊत यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. अंबड जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती अनिता इटुबोने, समन्वय अधिकारी-पो.नि. श्री. हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोअं/ विलास चव्हाण, साईनाथ तोडकर, सुनिल पाटील, शिरीष वाघ, चालक- सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

18.7.2022

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.